# दिव्य वार्ता

वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- सोमवार दि.२० ऑक्टोबर २०२५ पाने ४ किंमत ३


# निवडणूकीच्या बैठकीत घड्याळचे काटे घळघळ फिरले

## जिंकून कसे यायचे हे सोडून एकमेकांचे उणी दुणी काढले, झालेल्या भाषणामुळे बैठकीचे वातावरण जोरदार तापले

बीड, (दिव्य न्युज):- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची नगरपालिकेसाठी झालेली आढावा बैठक काहीसी वादळी झाली. सुरवातीलाच एकमेकांची उणीदुणी काढली जात असल्याने वातावरण तापले होते. पक्षाशी एकनिष्ठ असणाऱ्यांनाच उमेदवारी द्या, नगराध्यक्ष व इतर उमेदवार व्यक्तीनिष्ठ नसावेत असा कळीचा मुद्दा काही पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला.

त्यांचा रोख नेमका कोणाकडे होता? हे लक्षात आल्याने दुसऱ्या बाजूने नाव घेऊन टीका करू नका, अशी सूचना करण्यात आली. उण्या-दुण्याने सुरवात झालेल्या बैठकीचा शेवट नेत्यांच्या मध्यस्थीने गोड झाला. राष्ट्रवादी काँग्रेसची बीड नगरपालिकेबाबत पक्षाने बोलविलेल्या रविवारच्या (ता. १९) बैठकीस सुरवातीला एकमेकांचे उणे-दुणे काढण्याने सुरवात झाली. शेवटी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली एकदिलाने काम करून पालिकेत विजय मिळवायचा, असा सामोपचार झाला.

दोन दिवसांपूर्वी पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी बोलाविलेल्या बैठकीतील माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्यावरील अप्रत्यक्ष टीकेचे पडसाद आज जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर चव्हाण यांनी बोलाविलेल्या बैठकीत उमटले. ॲड. चव्हाण, ओबीसी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, युवक आघाडीचे जिल्हाध्यक्ष बळिराम गवते, विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर, फारुक पटेल, अमर नाईकवाडे, शेख निजाम, अशोक हिंगे, अविनाश नाईकवाडे, भागवत तावरे, रमेश चव्हाण, रणजित बनसोडे, भीमराव वाघचौरे, विनोद मुळूक, शुभम धूत आदी उपस्थित होते.

नगराध्यक्ष व इतर उमेदवार व्यक्तीनिष्ठ नसावेत, पक्षनिष्ठ उमेदवारांना संधी द्यावी, एकमेकांचे नाव घेऊन टीका करू नये, आम्ही पक्षाच्या व अमरसिंह पंडित यांच्या सांगण्यावरूनच विधानसभेला काम केल्याचे त्यांनी नमूद केले, असे मत अमर नाईकवाडे यांनी व्यक्त केले. त्यांचा रोख डॉ. क्षीरसागर यांच्यावर होता. राजेश्वर चव्हाण व बळिराम गवते यांनी अजित पवार यांच्या माध्यमातून जिल्ह्यात होत असलेला विकास, त्यांची दूरदृष्टी असे मुद्दे पुढे करत शहराचा कायापालट करण्यासाठी एकलिदाने लढण्याची साद घातली. तर युवकांना संधी द्यावी, असे मतही मांडले

बैठकीत पक्षाचे आमदार संग्राम जगताप यांच्या भूमिकेबद्दलही ऊहापोह झाला. मुस्लिम



समाज पक्षासोबत असताना जगताप यांची भूमिका मुस्लिम द्वेषाची असल्याने आम्हाला मान्य नसल्याचा मुद्दा फारुक पटेल यांनी मांडला. त्याला उपस्थितांनीही होकार दिला. याबाबत पक्षाला कळविण्याचा शब्द चव्हाण यांनी दिला. दिवाळीनंतर व्यापक बैठक घेण्यात येणार असल्याचे यावेळी राजेश्वर चव्हाण यांनी जाहीर केले.
















# बीडमध्येही दिसणार ‘बदलापूर पॅटर्न’, धनंजय मुंडेंचे वक्तव्य, शिंदे गटाची धाकधूक वाढली



बीड । दिव्य न्युज

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी येत्या काही दिवसांत सुरू होणार आहे. विविध जिल्ह्यात राजकीय समीकरणे जुळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. एकीकडे आघाडी युतीची चर्चा सुरू असताना दुसरीकडे स्वबळाची चाचपणी करण्यात येत आहे. आता बीड जिल्ह्यातही 'बदलापूर पॅटर्न'ची चर्चा सुरू झाली आहे. बीडमधील निवडणुकीत मुंडे बंधू-भगिनी एकत्र येण्याची दाट शक्यता असून राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांनी तसे संकेत दिले आहेत.

बीडच्या परळी तालुक्यातील बोधेगाव येथे विकास कामाचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी धनंजय मुंडे यांनी संभाव्य युतीचे संकेत दिले. ग्रामपंचायतीची निवडणूक असो किंवा जिल्हा परिषद आम्ही कोणतीही निवडणूक हलक्यात घेत नाही. माझी आणि ताई (पंकजा मुंडे) यांची राज्यात महायुतीची सत्ता आहे. या संदर्भात चर्चा झाली आहे आणि मला पूर्ण विश्वास आहे की या निवडणुकीतही भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र लढेल, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले.

धनंजय मुंडे यांनी म्हटले की, माझी आणि पंकजाताईंची चर्चा झाली आहे. आणखी पूर्ण चर्चा होणे बाकी आहे. त्यामुळे इच्छुक आहेत त्यांनी निश्चिंत राहावे असेही मुंडे यांनी म्हटले. दरम्यान, भाजप आणि राष्ट्रवादी एकत्र आल्यास शिंदे गटाला स्वबळ अथवा मुंडे बहीण-भावांच्या निर्णयासमोर नमतं घ्यावं लागणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे आता शिंदे गटाचेही या संभाव्य युतीकडे लक्ष लागले आहे.

# संभाजी महाराज सासऱ्यांकडून मारले गेले, फक्त औरंगजेबाचे....बच्चू कडूंचे वादग्रस्त विधान

मुंबई । दिव्य न्युज

बुलढाणा जिल्ह्यातील पातुर्डा येथे झालेल्या राज्यव्यापी शेतकरी हक्क परिषद पार पडली. यावेळी राज्याचे माजी आमदार आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या मृत्यूबाबत खळबळजनक विधान केले आहे. संभाजी महाराजांना मारण्यासाठी औरंगजेब बदनाम झाला, पण त्यांना त्यांच्याच सासऱ्यांनी मारले, असा दावा बच्चू कडू यांनी केला.

बच्चू कडू काय म्हणाले?

पातुर्डा येथे राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रमुख महादेव जानकर आणि ऑल इंडिया पॅन्थर सेनेचे दीपक केदार यांच्या उपस्थितीत ही परिषद पार पडली. यावेळी बच्चू कडू यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल एक वक्तव्य केले. छत्रपती शिवरायांनी जी वतनदारी बंद केली, त्या वतनदारीविरोधात पहिलं आंदोलन झालं, पहिला संघर्ष तोच झाला. पाटील, कुलकर्णी, देशपांडे, देशमुख सर्व जातीत ज्या गावात जी जात मोठी असेल, त्याचा वतनदार असायचा. तो २० गावांना लुटायचा. तेव्हा जर ४ क्किंटल कापूस आला, तर त्यातील दोन क्किंटल त्याला द्यावा लागत होता. नाही दिलं तर ते पोरी-बाळी उचलून घेऊन जायचे. हे आमचेच वतनदार होते. त्या वतनदारीतून गुलामशाही, आदिलशाही, निजामशाही चालायची. असे बच्चू कडू म्हणाले.



## फक्त एक टक्का मेहनत आंदोलनात करा

यावेळी आमदार बच्चू कडू यांनी पंजाबमधील शेतकरी आंदोलनाचा संदर्भ देत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर टीका केली. येत्या २८ तारखेला शेतकऱ्यांनी नागपूर येथे एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले. पंजाबच्या शेतकऱ्यांनी १३ महिने आंदोलन करून काळे कायदे रद्द करायला लावले. आणि आम्ही बायकोची आठवण आली की चाललो घरी. तुम्ही शेतात जेवढी मेहनत करता, त्याच्या फक्त एक टक्का मेहनत आंदोलनात करा, तुमचे काम होईल, असे बच्चू कडू म्हणाले.

## नवा वाद निर्माण होण्याची शक्यता

या वतनदारी प्रथेवर बोलताना बच्चू कडू यांनी थेट संभाजी महाराजांचा उल्लेख केला. पहिली वतनदारी बंद केली म्हणून संभाजी राजे सासऱ्यांकडून मारले गेले. नाव औरंगजेबाचं असलं तरी सासरा किती कारणीभूत आहे, हे शोधायला हवं. राजा मरण पत्करायला तयार झाला, पण त्यांनी वतनदारीला साथ दिली नाही, असे बच्चू कडू यांनी सांगितले. बच्चू कडू यांच्या या विधानामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. या वक्तव्यावर राजकीय आणि ऐतिहासिक वर्तुळातून काय प्रतिक्रिया येतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा



अंबाजोगाई । दिव्य न्युज

अंबाजोगाई येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथे ग्रंथालय विभाग आणि मराठी विभाग यांच्या विद्यमाने भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाच्या आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ हे होते.

या प्रसंगी बोलताना त्यांनी वाचन लेखन आणि चिंतन या त्रिसूत्रीच्या आधारे विद्यार्थ्यांनी स्वतःला संपन्न केले पाहिजे परंतु दिवसेंदिवस वाचन संस्कृती कमी होत आहे. प्राचीन, मध्ययुगीन ते आजवरचे महत्त्वाचे ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध असतात. विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासावी, मोबाईलच्या विश्वात न रमता ग्रंथालयात अधिकाधिक वेळ व्यतीत केला पाहिजे, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. ग्रंथपाल सुनील भोसले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिलीप भिसे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.संकेत हंडीबाग यांनी मानले. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. रमेश शिंदे, उपप्राचार्य प्रा.पी.के.जाधव, डॉ. मुकुंद राजपंखे, डॉ. अरविंद घोडके, डॉ. अनंत मरकाळे, ग्रंथपाल प्रा. सुनील भोसले,प्रा. शैलेश जाधव प्रा. रोहित पाटील प्रा. सुरेश पाटील, प्रा. राहुल कांबळे प्रा. संजय जाधव, प्रा. बाबासाहेब माने, विजय काकुळते महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

# परधर्मातील मुलासोबत पळून जाणाऱ्या मुलींचे हातपाय तोडा, भाजपच्या माजी खासदाराचं वादग्रस्त विधान!

मुंबई । दिव्य न्युज

भाजपच्या माजी खासदार प्रज्ञासिंग ठाकूर आपल्या वादग्रस्त विधानांमुळे कायम चर्चेत असतात. आता त्यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त विधान केलं आहे. जर तुमची मुलगी परधर्मातील मुलाबरोबर पळून जात असेल, तर तिचे हातपाय तोडा, असा सल्ला त्यांनी मुलींच्या पालकांना दिला आहे. त्यामुळे चांगलीच खळबळ उडाली आहे. त्यांच्या या विधानाचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होतो आहे. त्यानंतर अनेकांनी संतप्त प्रतिक्रिया दिल्या आहेत.

एका कार्यक्रमात बोलताना प्रज्ञासिंग ठाकूर म्हणाल्या, जर तुमची मुलगी तुमचं ऐकत नसेल आणि जर ती कोणत्याही परधर्मातील व्यक्तीसोबत पळून जाण्याचा प्रयत्न करत असेल, तर तिचे पाय तोडायला मागेपुढे बघू नका. मुलींना लहानपणापासूनच संस्कार शिकवले पाहिजेत. पण जर त्या प्रेमाने ऐकत नसतील तर पालकांनी कठोर भूमिका घेतली पाहिजे

पुढे बोलताना, आपल्या मुलीच्या भल्यासाठी जर तिला मारहाण करावी लागली, तर पालकांनी मागे हटू नये, असा सल्लाही त्यांनी दिला. ''जेव्हा मुलीचा जन्म होतो, तेव्हा पालक तिला लक्ष्मी आणि सरस्वतीचं रूप मानतात. पण तीच मुलगी जेव्हा मोठी होऊन परधर्माच्या मुलाबरोबर पळून जाण्याचा प्रयत्न करते, तेव्हा तिला वेळीच रोखणं गरजेचं असतं. मुलींवर लक्ष ठेवणं हे पालकांचं पहिलं कर्तव्य आहे'', असं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, प्रज्ञासिंग ठाकूर यांच्या विधानानंतर मोठा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यांचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होतो आहे. यावर अनेकांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. महत्त्वाचे म्हणजे यावर राजकीय प्रतिक्रियादेखील उमटण्याची शक्यता आहे. खरं तर प्रज्ञा सिंह ठाकूर यांनी याप्रूवीही अनेकदा वादग्रस्त विधान केली आहेत. आता त्यांनी थेट मुलींच्या स्वातंत्र्याबात विधान केल्याने मोठा वाद निर्माण झाला आहे.



# शॉर्टसर्किटमुळे ऊस जळून शेतकऱ्याचे लाखोचे नुकसान:स्थानिकांचा आग विझवण्याचा प्रयत्न अखेर निष्फळ



दिंद्रुड । दिव्य न्युज

शेतातून गेलेल्या विद्युत लाईटच्या तारा एकमेकाला चिटकून शॉर्टसर्किटमुळे शेतकऱ्याचा तीन एकर ऊस जळून लाखोचे आर्थिक नुकसान झाल्याची घटना काल रविवारी (१९ ऑक्टोबर) दुपारी घडली.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील वैजनाथ व्यंकटराव काशीद या शेतकऱ्याचे येथील शिवारातील गट क्र.२०३ मध्ये ३ एकर ४ गुंठे क्षेत्रात ऊस लागवड केलेली आहे. माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील वैजनाथ व्यंकटराव काशीद या शेतकऱ्याचे येथील शिवारातील गट क्र.२०३ मध्ये ३ एकर ४ गुंठे क्षेत्रात ऊस लागवड केलेली आहे. रविवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास ११ केव्हीच्या पोलवरील लाईनच्या दोन तारा एकमेकास चिटकल्याने शॉर्टसर्किट होऊन तोडणीस आलेल्या संपूर्ण उसाला शेताने पेट घेतला. स्थानिकांचा आग विझवण्याचा प्रयत्न अखेर निष्फळ ठरल्याने क्षेत्रातील सर्व ऊस जळून खाक झाला. महसूल प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून शेतकऱ्याला मदत करण्याचे आवाहन शेतकरी वर्गातून होत आहे.महावितरण प्रशासनाने शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान टाळण्यासाठी शेतीक्षेत्रात विद्युत तारा सुरक्षीत कराव्यात. शॉर्टसर्कि होणार नाही यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी. अशी मागणी देखील शेतकऱ्यांमधून केली जात आहे.

# शिवसेना पक्ष चिन्हाचा निर्णय एकनाथ शिंदेंच्या बाजूने लागणारच नाही, उद्धव ठाकरे..; असीम सरोदेंनी काय म्हटलंय?

मुंबई । दिव्य न्युज

शिवसेना पक्ष चिन्ह आणि नावाबाबतची सुनावणी १२ नोव्हेंबरपासून सुरु होते आहे. या सुनावणीत नेमकं काय होणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे. २०२२ मध्ये जेव्हा एकनाथ शिंदेंनी बंड केलं तेव्हा त्यांच्या विरोधात उद्धव ठाकरे सर्वोच्च न्यायालयात गेले. कारण निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह हे एकनाथ शिंदेंचं आहे असा निकाल दिला होता. त्यानंतर बऱ्याच तारखा पडल्या पण हे प्रकरण प्रलंबित राहिलं. आता शिवसेना कुणाची याबाबत सुनावणी सुरु होते आहे. दरम्यान याबाबत ज्येष्ठ कायदे तज्ज्ञ असीम सरोदे यांनी भाष्य केलं आहे.

असीम सरोदे काय म्हणाले?

वारंवार तारीख देण्याची जी प्रक्रिया आहे ती वाईट पातळीला पोहचली आहे. न्यायाला उशीर होणं हा अन्यायच आहे. तारीख देण्याच्या माध्यमातून अन्याय होत असेल, अन्यायाला खतपाणी मिळत असेल तर हा मुद्दा गंभीर आहे. उद्धव ठाकरेंची बाजू संवैधानिक पातळीवर अत्यंत मजबूत आहे. त्यामुळे जो निर्णय आहे तो न्यायालयाने त्वरित द्यावा असं मला वाटतं.

उद्धव ठाकरेंच्या विरोधात निकाल देताच येणार नाही-सरोदे



उद्धव ठाकरेंच्या विरोधात निकाल देताच येणार नाही. कारण त्यांची बाजू मजबूत आहे. जो काही निकाल द्यायचा आहे तो निकाल लवकरात लवकर न्यायालयात द्यावा अशी माझी मागणी आहे. एकनाथ शिंदेच्या बाजूने निकाल लागला तर काय? हा प्रश्नच काल्पनिक आहे. कारण एकनाथ शिंदेंच्या बाजूने निकाल लागणारच नाही. हे माझंच म्हणणं नाही ज्यांना कायदा कळतो, संविधान कळतं ते कुणीही हे सांगतील. एकनाथ शिंदेंचा प्रवास ज्यांना कळला आहे त्यांनाही हे माहीत आहे. कारण एकनाथ शिंदेंनी पक्ष चोरला आहे. निष्ठा विकली आहे. त्यांनी संविधानाची मोडतोड करुन अडीच वर्षे मुख्यमंत्रिपदही गाजवलं आहे. एकनाथ शिंदेंच्या बाजूने निकाल लागण्याची शक्यता शून्य आहे. कायदेशीर आणि संवैधानिक पद्धतीने निकाल लागणार असेल तर तो उद्धव ठाकरेंच्या बाजूनेच लागू शकतो.

तर एकनाथ शिंदेंनी चिन्ह विरहित निवडणुका लढून दाखवाव्यात

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ आल्या आहेत. तसंच जिल्हा परिषदांच्या निवडणुकाही जवळ आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर तरी न्यायालयाने निकाल दिला पाहिजे. खरंतर एकनाथ शिंदेंनी न्यायालयात जाऊन सांगितलं पाहिजे की या प्रकरणाचा निकाल द्या. जर निकाल उद्धव ठाकरेंच्या बाजूने लागला धनुष्य बाण विरहित निवडणुका एकनाथ शिंदेंनी जिंकून दाखवाव्यात असंही असीम सरोदे यांनी म्हटलं आहे. असीम सरोदे यांनी या प्रकरणी साम टीव्हीशी संवाद साधला त्यावेळी त्यावेळी त्यांनी हे विधान केलं आहे.

एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासह काही नेते भाजपात जातील-सरोदे

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकनाथ शिंदेंनी धनुष्य बाण विरहित आणि शिवसेना हे नाव वगळून लढून दाखवाव्या. जर योग्य निर्णय झाला तर महाराष्ट्राच्या राजकारणाचं चित्र बदलू शकेल. जर उद्धव ठाकरेंच्या बाजूने निकाल लागला एकनाथ शिंदे भाजपाच्या गोटात जातील का? असं विचारलं असता असीम सरोदे म्हणाले, एकनाथ शिंदे हे भाजपात दाखल झाले आहेतच. शिवसेनेतील फूट राजकीय कारणासाठी वापरण्यासाठी त्यांचं अस्तित्व कायम ठेवलं आहे. जर एकनाथ शिंदेंच्या विरोधात निकाल लागला तर त्वरित एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासह काही लोकांना भाजपात घेतलं जाईल. जे उद्धट, अर्वाच्च बोलणारे आहेत, ज्यांचे राजकीय चेहरे विद्रुप आहेत अशा लोकांना भाजपा त्यांच्या पक्षात घेणार नाही.

# शनिवारवाड्यात नमाज पठण झाल्याचा दावा, सत्ताधारी भाजप आणि राष्ट्रवादीत टोकाची जुंपली, मेधा कुलकर्णींच्या अटकेची मागणी

## आवरा! शनिवारवाडा कोणाच्या बापाचा नाही; मेधा कुलकर्णींवर अजितदादांच्या पक्षाच्या नेत्या भडकल्या



पुणे । दिव्य न्युज

भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांच्यावर धार्मिक तेढ निर्माण केल्या प्रकरणी तातडीने गुन्हा दाखल करा, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्त्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी केली आहे. पुण्यात भाजपने खासदार मेधा ताई यांना आवरा बाबा. शनिवारवाडा ही वास्तू कोणाच्या बापाचा नाही. शनिवारवाडा मराठा साम्राज्य, पेशव्यांचा आहे. पुणेकर सर्व जाती धर्मांचे आहेत. मेधा कुलकर्णी पुण्यातील हिंदू-मुस्लिम बांधवांचं वातावरण खराब करत आहेत. जाणीवपूर्वक तेढ निर्माण करत आहे. त्या विसरल्या आहेत की त्या खासदार आहेत, अशी टीका पाटील ठोंबरे यांनी केली. कोथरुडमध्ये नाटकं झाली, आता कसब्यातून येऊन जाणीवपूर्वक हिंदू-मुस्लिम तेढ निर्माण करत आहेत. त्यांच्यावरच तातडीने गुन्हा दाखल करा. खासदार ताईला प्रार्थना असो की दुवा करणे असो एकच आहे हे समजत नाही किंवा त्या जाणीवपूर्वक करत आहे. मेधा कुलकर्णी यांनी शनिवारवाड्यामध्ये येऊन जी नाटकं केली त्यासाठी त्यांच्यावर गुन्हा दाखल करणे गरजेचे आहे, अशी भूमिका रुपाली पाटील ठोंबरे यांनी मांडली. खासदार बाईंच्या या कृत्याला तातडीने आळा घालणं गरजेचं आहे. भाजपला आमचं सांगणं आहे या खासदार बाईला आवरा. मेधा कुलकर्णी यांना जाणीवपूर्वक वातावरण बिघडवायचं असतं. खासदारकीची घेतलेली शपथ विसरून मेधा कुलकर्णी सातत्याने जाणीवपूर्वक पुण्यातील वातावरण बिघडवायचं काम करतात, असा आरोप रुपाली पाटील ठोंबरे यांनी केला.

## शनिवारवाड्यात नमाज पठणाचा व्हिडिओ व्हायरल, मेधा कुलकर्णी यांचा गंभीर आरोप

पुणे । भाजपाच्या खासदार मेधा कुलकर्णी यांनी शनिवारवाड्यात मुस्लीम मुली नमाज पठण करत असल्याचा दावा करणारी चित्रफित आपल्या समाज माध्यमांवर प्रसिद्ध केला आहे. त्यांच्या एक्सवरील पोस्ट नंतर ऐन दिवाळीत पुण्यातील वातावरण चांगलेच तापले आहे.

पुण्याचे वैभव शनिवारवाडा ऐतिहासिक वारसा स्थळ आहे की गैर हिंदू प्रार्थना स्थळ आहे? असा सवाल विचारताना सार्वजनिक ठिकाणी विशेषत: वारसा स्थळी मुलींनी नमाज पठण केल्याच्या कृतीवर खासदार मेधा कुलकर्णी यांनी टीका केली आहे. मेधा कुलकर्णी यांच्या या पोस्टनंतर समाज माध्यमांवर चित्रफित वेगाने पसरली झाली असून, चित्रफित नेमकी कधी चित्रित केली याबद्दलची माहिती समोर येऊ शकलेली नाही. किंबहुना पोलिसांकडून या संदर्भात कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

मेधा कुलकर्णी यांचा आरोप काय?

ऐतिहासिक वारसा स्थळ की गैर हिंदू प्रार्थना स्थळ? सारसबाग येथे झालेल्या नमाज पठणाच्या घटनेनंतर शनिवार वाड्यात घडलेला प्रकार हा प्रत्येक पुणेकरासाठी चिंतेचा आणि संतापाचा विषय आहे. पुणे प्रशासन नक्की करते काय? आपल्या वारसा स्थळांचा सन्मान कुठे हरवतोय? शनिवार वाड्यात नमाज पठण चालणार नाही, हिंदू समाज आता जागृत झाला आहे, असे मेधा कुलकर्णी यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.



पुणे : भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांनी शनिवार वाड्यामध्ये नमाज पठण सुरू असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर टाकला होता. यानंतर शनिवार वाड्याजवळ प्रतिकात्मक आंदोलन देखील केले. या आंदोलनानंतर भाजपचा मित्र पक्ष असलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला नेत्या रूपाली पाटील-ठोंबरे यांनी खासदार मेधा कुलकर्णी यांच्यावर निशाणा साधला.

शनिवारवाड्याच्या आतील बाजूस काही व्यक्ती नमाज पठण करत असल्याचा व्हिडिओ मेधा कुलकर्णी यांनी समाज माध्यमावर टाकला होता. या व्हिडिओच्या आधारे शनिवार वाड्यात नमाज पठण चालणार नाही, हिंदू समाज आता जागृत झाला आहे, असे मेधा कुलकर्णी म्हणाल्या आहेत. त्यानंतर त्यांनी शनिवार वाडा परिसरात जमण्याचे आवाहन केले आणि त्या ठिकाणी जाऊन प्रतिकात्मक आंदोलन देखील केले. या आंदोलनादरम्यान त्यांनी शनिवार वाडा परिसरात असलेल्या मजारीवर भगवा झेंडा फडकवण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान पोलीस आणि आंदोलकांमध्ये झटापट देखील झाली. यादरम्यान माध्यमांशी बोलताना मेधा कुलकर्णी म्हणल्या, 'याबाबत आम्ही पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारला असता त्यांनी ही घटना घडल्याचे कबूल केले असून तातडीने या लोकांना बाहेर काढण्यास सांगितले. एखाद्या शुक्रवारी ही घटना घडल्या असल्याचे देखील त्यांच्याकडून कळवण्यात आले आहे. ही घडलेली घटना अत्यंत चुकीची आहे. या ठिकाणी पारंपारिक पद्धतीने गणेश उत्सव साजरा होत होता. तो करण्यास नकार दिला जातो. मात्र, नमाज पठण कसे करू दिले जाते, असा सवाल कुलकर्णी यांनी उपस्थित केला आहे.

# कोरोनाकाळातील उपचारांवरून खळबळ, मृतदेहाची परस्पर विल्हेवाट, नगरमध्ये डॉक्टरांसह हॉस्पिटलविरोधात गुन्हा

अहमदनगर । दिव्य न्युज

कोरोना महामारीच्या काळात रुग्णाच्या मर्जीविरुद्ध जबरदस्तीने उपचार करून घेतल्याचा, अवाजवी बिल आकारल्याचा आणि मृतदेहाची परस्पर विल्हेवाट लावल्याचा गंभीर आरोप शहरातील पाच नामांकित डॉक्टरांसह विखे पाटील मेमोरिअल हॉस्पिटलमधील पॅथॉलॉजिकल लॅबच्या तज्ञ डॉक्टरांवर करण्यात आला आहे. या प्रकरणात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, वैद्यकीय क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.



गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये न्यूक्लिअस हॉस्पिटलचे डॉ. गोपाळ बहुरुपी, डॉ. सुधीर बोरकर, डॉ. मुकुंद तांदळे, डॉ. अक्षयदीप झावरे पाटील, डॉ.सचिन पांडुळे, तसेच विखे पाटील मेमोरिअल हॉस्पिटलमधील पॅथॉलॉजिकल लॅबचे तज्ञ डॉक्टर आणि काही अज्ञात कर्मचारी यांचा समावेश आहे. हा गुन्हा अशोक खोकराळे यांच्या फिर्यादीवरून नोंदवण्यात आला असून, त्यांनी न्यायालयाच्या आदेशानंतर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. ऑगस्ट २०२० मध्ये त्यांच्या वडिलांना कोरोनाची लक्षणे दिसल्याने न्यूक्लिअस हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, रुग्णाच्या मर्जीविरुद्ध जबरदस्तीने अॅडमिट करून घेतल्याचे, त्यांच्या आरोग्यस्थितीची खरी माहिती लपवण्यात आल्याचे आणि जाणीवपूर्वक जास्त प्रमाणात औषधे दिल्याचे आरोप करण्यात आले. तसेच, हॉस्पिटलकडून अवाजवी बिल आकारण्यात आले आणि उपचार खर्चाबाबत कोणतीही स्पष्टता न दिल्याचे तक्रारीत नमूद आहे..

मृतदेहाची परस्पर विल्हेवाट?


सर्वात धक्कादायक म्हणजे, रुग्णाचा मृत्यू झाल्यानंतर नातेवाईकांना माहिती न देता मृतदेहाची परस्पर विल्हेवाट लावण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात मृतदेहाचे ठसे आणि पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या गंभीर आरोपांनंतर तोफखाना पोलिसांनी संबंधित डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. वडिलांच्या मृत्यूची माहितीही दिली नाही, असे तक्रारदार अशोक खोकराळे म्हणाले.

# 'टीईटी' संदर्भात इतर मागास बहुजन कल्याण विभागाचा मोठा निर्णय काय आहे निर्णय, परिणाम काय?

पुणे । दिव्य न्युज

शिक्षक पात्रता परीक्षेसंदर्भात (टीईटी) सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर राज्यातील शिक्षक, शिक्षक संघटनांमध्ये अस्वस्थता निर्माण झालेली आहे. मात्र, राज्य सरकारच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाने सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयास अनुसरून कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पाच वर्षांपेक्षा अधिक सेवाकाळ बाकी असलेल्या शिक्षकांना दोन वर्षांत टीईटी उत्तीर्ण होणे आवश्यक ठरणार आहे.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे कक्ष अधिकारी श्रीनाथ हेंद्रे यांनी याबाबतच्या सूचना इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाच्या संचालकांना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव यांच्या अध्यक्षतेखाली १६ ऑक्टोबर रोजी बैठक झाली. या बैठकीत टीईटीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार कार्यवाही



करण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९मधील तरतुदीनुसार सर्वच शिक्षकांना 'शैक्षणिक व्यावसायिक आणि शिक्षक पात्रता पात्रता' उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. आरटीई कायदा लागू होण्यापूर्वी भरती होऊन सेवेत असलेल्या शिक्षकांचा पाच वर्षांपेक्षा अधिक सेवाकाळ बाकी असल्यास त्यांच्यासाठी दोन वर्षांत टीईटी उत्तीर्ण करणे बंधनकारक राहील.

# मा.मंत्री.बाळासाहेब थोरात,पद्मश्री पोपटराव पवार साहेब यांच्या उपस्थित होणार जे.आर पवार साहेबांचा सेवानिवृत्ती सोहळा, मोठ्या संख्येने उपस्थित रहा-प्रदिप थोरवे

पिंपळा । दिव्य न्युज

आष्टी तालुक्यातील पिंपळा येथील सहकार,शिक्षण,राजकारण,समाजकारनातील दांडगा अभ्यास,कामावरील निष्ठा,आरोग्यदूत,दानशूर म्हणून ओळखले जाणारे सामाजिक बांधिलकी हेच ब्रीद जपणारे मा.श्री.जे आर पवार साहेब, शासकीय तलाठीची नोकरी सोडून सुरवातीला कडा कारखाना आणि नंतर त्यांनी ३८ वर्ष श्री.वृध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे मैनेजिंग डायरेक्टर म्हणून त्यांनी काम पाहिले.व दादा पाटील राजळे महाविद्यालय ची संचालक पदाची धुरा देखील सांभाळली.

एकूण ४८ वर्ष सेवा करून वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना ली. येथून मैनेजिंग डायरेक्टर पदावरून ते निवृत्त होत आहेत.त्यांचा सेवापूर्ती सोहळा मा.मंत्री.बाळासाहेब थोरात साहेब ,मा.पद्मश्री.पोपटराव पवार साहेब(हिवरेबाजार),मा.खा.बजरंग बप्पा सोनवणे,मा आ.मोनिकाताई राजळे, मा.आ.सुरेश(आण्णा)धस,मा.आ भीमराव धोंडे साहेब,मा.आ.साहेबराव (नाना) दरेकर,मा.आ बाळासाहेब (काका)आजबे ,डॉ.एस बी निमसे साहेब



(कुलगुरू) आणि बीड व अहिल्यानगर जिल्ह्यातील साहेबांवर प्रेम करणाऱ्या तमाम मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांच्या गावी पांडुरंग मंगल कार्यालय,पिंपळा ता-आष्टी,जि.बीड येथे दिनांक २४/१०/२०२५ रोजी सकाळी १० वाजता संपन्न होणार आहे,तरी आपण सर्वानी मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित राहावे अशी विनंती पवार साहेबांचे भाचे प्रदिप थोरवे यांनी केली आहे.

# ८८ लाखांची दारू लंपास प्रकरणातील अटक आरोपींना जामीन मंजूर

जिंतुर । दिव्य न्युज : सालेह चाऊस

जिंतूर. बनावट अपघाताच्या माध्यमातून ८८ लाख रुपयांची विदेशी दारू लंपास झाल्याचे प्रकरण जिंतूर तालुक्यात तथाकथितरित्या घडले होते. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींना, परभणी येथील माननीय जिल्हा व सत्र न्यायालयाने दि. १८ऑक्टोबर २०२५ रोजी जामिनावर सोडण्याचे आदेश दिले. आरोपींच्या वतीने एड. सुनिल बुधवंत यांनी प्रभावी बाजू मांडली.



या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, ३१ ऑगस्ट २०२५ रोजी नाशिक येथील मद्य कंपनीतून नांदेड येथील वाईन शॉप निघालेल्या ट्रकमध्ये (क्रमांक एमएच १५ जीव्ही १७३५) १ कोटी ३९ लाख रुपयांची विदेशी दारू भरलेली होती. जिंतूर तालुक्यातील चिंचोली दराडे शिवारात ट्रकचा अपघात झाल्याचा बनाव करून ८८ लाख १७ हजार ८२९ रुपयांची दारू चोरी झाल्याने, कंपनीच्या प्रतिनिधीने ८ सप्टेंबर रोजी जिंतूर पोलीस ठाण्यात ट्रक चालक प्रभाकर विश्वनाथ घुगे याच्या विरुद्ध फिर्याद देत गुन्हा नोंद केला होता. त्यानंतर, जिंतूर पोलिसांनी ट्रक चालकास पुणे येथून ताब्यात घेतले आणि तीन आरोपी नामे अनिल शिवाजी चव्हाण, रविंद्र हरिभाऊ पवार आणि सचिन अशोक सोळंके यांना दि. २६ सप्टेंबर रोजी अटक केली होती. या तीन आरोपींच्या माध्यमातून पोलिसांनी ६५ लाख ३९ हजार ७२० रुपयांची दारू जप्त केल्याचा दावा केला होता. यानंतर, पोलिसांनी जवळपास मकोका सारखेच असणारे संघटित गुन्हेगारी टोळी बाबतचे भारतीय न्याय संहितेतील कलम १११ लावले होते, यामुळे प्रकरणाची गंभीरता वाढली होती. त्यामुळे, आरोपींना तब्बल आठ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. त्यानंतर, जिंतूर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी या तीन आरोपींना न्यायालयीन कोठडीत घेत आरोपींची परभणी येथील जिल्हा कारागृहात रवानगी केली होती. तदनंतर,आरोपींनी परभणी येथील जिल्हा सत्र न्यायालयात एड सुनिल बुधवंत यांच्या मार्फत जामिनावर सोडण्यासाठीचा विनंती अर्ज दाखल केला होता. या अर्जावर सुनावणी दरम्यान एड. सुनिल बुधवंत यांनी आरोपींच्या बाजूने सखोल युक्तिवाद करत त्यांची ठोस बाजू मांडली, जिंतूर पोलिसांतर्फे तपासी अधिकाऱ्यांनी हजर होऊन त्यांचे म्हणणे मांडले व सरकारी वकिलांनी युक्तिवाद केला. सर्व बाजू ऐकल्यानंतर, मा. न्यायालयाने तीनही आरोपींना जामिनावर सोडण्याचे आदेश दिले. एड सुनिल बुधवंत यांना या प्रकरणात ड. भगवान घुगे आणि एड नरेश गव्हाणे यांनी सहकार्य केले. पोलिसांनी, या प्रकरणाची गंभीरता वाढवण्यासाठी जवळपास मकोका सारखेच असणारे संघटित गुन्हेगारी टोळी बाबतचे भारतीय न्याय संहितेतील कलम १११ लावले होते. परंतू, ड. सुनिल बुधवंत यांनी याबद्दल सविस्तर अभ्यासपूर्ण मांडणी करत, कलम १११ या प्रकरणात लागू शकत नाही हे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

## उघड्या विद्युत तारांमुळे धोका: एअरबंच वायरची तातडीने गरज

पाटोदा । दिव्य न्युज

शहरातील प्रभाग क्रमांक ११ मधील भगवान परशुराम नगर, सुतार गल्ली, पाटील गल्ली आणि आजूबाजूच्या भागात उघड्या विद्युत तारांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. जुन्या तारा झाडांना आणि भिंतींना लागल्या आहेत. काही ठिकाणी तारा जमिनीच्या अगदी जवळ आल्या आहेत. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. काही दिवसांपूर्वी दुपारी झालेल्या पावसात भगवान परशुराम नगरातील तारा तुटून रस्त्यावर पडल्या. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. मात्र या घटनेनंतर नागरिकांमध्ये भीती वाढली आहे. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तात्पुरती दुरुस्ती केली. एका लाईनवर एअरबंच वायर बसवण्यात आली. पण संपूर्ण परिसरात सुमारे एक किलोमीटर भागात एअरबंच वायर बसवणे गरजेचे आहे. शहरातील इतर भागांमध्ये आधीच एअरबंच वायर बसवल्याने अपघात कमी झाले आहेत. त्यामुळे भगवान परशुराम नगर आणि सुतार गल्ली परिसरातही हे काम तातडीने करावे, अशी नागरिकांची मागणी आहे. या भागात सुमारे २० पोल आहेत. सर्व पोलवर एअरबंच वायर बसवणे आवश्यक आहे. जुना पोलीस स्टेशन डीपी, पाटोदा येथील लघुदाब वाहिनीवरही एअरबंच केबल बसवणे गरजेचे आहे. पावसाळ्यात या ठिकाणी तारा झुलतात. पाण्याच्या संपर्कात येण्याची शक्यता वाढते. नागरिकांच्या मते, हे काम सौंदर्यीकरणासाठी नाही, तर जीवित सुरक्षेसाठी आहे.



# जिंतुर तालुक्यातील इटोली (डोगरतळा) शिवारात एका तरुणीवर सामुहिक बलात्काराच पोलीसांनी केला उलगडा

## एकूण सहा आरोपी मध्यून चार युवकांना अटक एक फरार तर एक अल्पवयीन असल्याने तपास चालू

जिंतूर । दिव्य न्युज : सालेह चाऊस

जितूर तालुक्यातील इटोली ( डोगरतळा ) शिवारात दिनांक १४ क्टोबर रोजी दुपारच्या वेळी एक युवक त्याच्या मैत्रीण युवती सोबत इटोली रस्त्यावरील एका ठिकाणी गप्पा मारत बसलेली असतांना तिथे आलेल्या सहा आरोपी पैकी १) करण २) शेषराव ३) शेख साबेर शेख सत्तार या आरोपीनी फिर्यादी युवतीला जबरदस्तीने तिचे इच्छेविरुद्ध शारीरक संभोग करण्यास भाग पाडले व आरोपी क्र ४) मंजीराम बापूराव टोम्पे ह्याने त्याचे चित्रीकरण केले, आरोपी क्र ५) व ६)अर्जुन आणि लखन यांनी फिर्यादीस धमकाहुन बॅगमधील ५००० रु काढून घेतले तसेच या मधील एक आरोपी हे अल्पवयीन असल्याने त्यांना वैद्यकीय अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याचावर सुद्धा गुन्हा दाखल करण्यात येणार आहे . या सर्व प्रकारनाची पोलीसांनी चित्रीकरण झाल्याच्या चर्चा नुसार तपास चक्रे फिरवून हा सर्व प्रकार उघडीस आणला त्या मुळे नागरीक समाधान व्यक्त केले.



या घटनेची फिर्याद दाखल नसल्या मुळे गुन्हा नोंद होण्यास विलंब झाला नंतर त्या युवतीने दिनांक १९ क्टोबर रोजी फिर्याद दिल्या नुसार घटनेचे गाभीर्य ओळखून पोलीसांनी अतीशय चांगल्या रितेने प्रकरणाचा तपास लावला आहे. पोलीस उपविभागीय अधिकारी श्री जिवन बेनिवाल व जिंतूरचे पोलीस निरीक्षक श्री गजेंद्र सरोदे यांनी संबंधीत आरोपींना तत्काळ अटक करून जेरबंद केले आहे . रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रकिया चालूच होती परभणीचे जिल्हा पोलीस अधिक्षक श्री रविंद्रसिह परदेशी यांनी जिंतूर ला रात्रीच भेट देऊन योग्य मार्गदर्शन केले व गुन्हा दाखल करण्यात आला सपोनि श्री पुंड यांनी गुन्हा दाखल करून घेतला पुढील तपास जिंतूर चे पोलीस निरीक्षक श्री गजेंद्र सरोदे हे करीत आहेत गुन्हा रजिष्टर क्रंमाक ५५७/२०२५ कलम ७०(१),१२६(१),३१० ( बिएनएस) २०२३ प्रमाणे व सहकलम ६६ ( ई) माहिती तंत्रज्ञान अधिनियमा नुसार १) अर्जुन दत्तराव बटकुळे( रा. भोगाव ता जिंतूर) २) शेख साबेर शेख सत्तार ( रा. भोगाव ता जिंतूर) ३) शेषराव दत्तराव शेवाळे( रा भोगाव ता जिंतूर) ४) मंजीराम बापूराव टोम्पे एक फरार आरोपी सह सर्वांनावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अल खैर पोलीस भरती पूर्व प्रशिक्षणार्थीसाठी मार्गदर्शन शिबीर व ड्रेस किट वाटप कार्यक्रम संपन्न





बीड । दिव्य न्युज

अलखैर मल्टिपर्पज फाऊंडेशन बीड ही एक सामाजिक संघटना आहे ती वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करीत आहे. मागील पाच वर्षांपासून अल खैर पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र चालवत आहे. त्या मधून आत्ता पर्यन्त ४० विद्यार्थी हे महाराष्ट्र पोलीस प्रशासनामध्ये रुजू झाले आहे. याही वर्षी अल खैर पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण बॅच २०२५ चालूच आहे. या बॅच मधील विद्यार्थ्यांसाठी आज मार्गदर्शन शिबीर ठेवण्यात आले होते. या कार्यक्रमात पोलीस भरतीसाठी तयार होणाऱ्या विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणार्थींना ड्रेस किटचे वाटप करण्यात आले.

पोलीस भरती प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या तयार करणे आहे. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना पोलीस भरती प्रक्रियेत यश मिळवता येईल. सोबतच या विद्यार्थ्यांना ड्रेस किट वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे मार्गदर्शक अब्दूल वकील सर होते तर, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविणारे डॉ मोमीन मुजाहिदीन अतिरिक्त शल्य चिकित्सक, कार्यक्रमाचे उद्घाटक व मार्गदर्शक डॉ अब्दूल अनीस सर, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित शेख मुजीब साहेब, सय्यद फेरोज अली, फारूख सर, डॉ शकील सर, अरबाज पठाण, विखार सर, सैफ अली सर, माजेद खान, आतिफ सय्यद, मोहसीन करीम, शेख शाहरुख, इलियास सिद्दीकी, डॉ आकीफ अन्सारी, वसीम खान आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आमीर खान यांनी केले. व कार्यक्रमाचे आभार अझहर इनामदार यांनी केले.

## बीड जिल्हा सहकारी मजुर संस्थांचा सहकारी संघ मर्यादित, बीड




**संघाची वैशिष्टे**

१) संघाची स्वत:चे मालकीची दोन मजली इमारत
२) मजूर सह. संस्थेच्या अडी अडचणी सोडवण्यात अग्रेसर
३) सभासद मजूर संस्थांना कामे मिळवुन देण्यात अग्रेसर

**-: संचालक मंडळ :-**

१) श्री जटाळ बद्रीनाथ दुधाराम, २) माने दिलीप विठ्ठलराव, ३) सोनवणे भगवान काकासाहेब, ४) शेख शब्बीर मन्सब, ५) सोनवणे माधव सर्जेराव, ६) तिडके परमेश्वर दत्तात्रय, ७) नागरगोजे भास्कर धोंडीराम, ८) क्षिरसागर आनंद सुभाष, ९) राठोड अंकुश दगडु, १०) गोरे वसंत भुजंगराव, ११) सौ. देसाई सुनिता काकासाहेब, १२) सौ. कटाळे राधाबाई नामदेव, १३) सौ. हावळे शकुंतला बाळासाहेब, १४) सौ. देशमुख संध्या मंगेश

**तज्ञ संचालक :- १) सुनिल बापुराव सिरसाट २) चौधरी मुजफ्फर सुलतान सर्व कर्मचारी वृंद**































हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०